अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १० सप्टेंबर २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ३४२ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

बोअरवेल सबमर्सिबल पंपसेटस् www.lubipumps.com ®©
50+ YEARS OF PUMPING TRUST
IS : 8034 CM/L - 1921453
CUSTOMER CARE NO. 9824200800
Lubi
PUMPS-MOTORS
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण "A" ग्रेड मान्यता प्राप्त प्रमाणपत्र
गुरुगणेश एंटरप्रायजेस - सोलापूर
Ph- 0217-2725363, M.:9423590463/ 9423588463

## बांधकामावरून लाथा बुक्क्यांनी मारहाण

✔ **सोलापूर :** अर्धवट पडलेल्या बांधकामावरून एका इसमास शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी घडली.याप्रकरणी दयानंद मडीवाळप्पा उप्पीन (वय-५८,रा.सिद्धेश्वर पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सचिन शिंदे (पूर्ण नाव माहित नाही) रा. सिद्धेश्वर पेठ,सुरवसे मंगल कार्यालय जवळ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. सचिन शिंदे याने दयानंद यांना सिद्धेश्वर पेठ एकनाथ मंदिर येथे असलेल्या घर जागेमध्ये जुने बांधकाम अर्धवट आहे, ते भिंत तु बांधून घे,येथे साप वगैरे येतात,असे म्हणून शिवीगाळ करत दमदाटी करत मारहाण केली, असे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पो.हे.कॉ. भालशंकर हे करीत आहे.

# तोफ पुन्हा धडधडली

# लढाई आरक्षणाची की आघाडीची आ.राऊत यांचा जरांगेंना सवाल

✔ बार्शी/प्रतिनिधी

**बार्शीचे आमदार राजेंद्र उर्फ राजाभाऊ राऊत यांनी तोफ सोमवारी पुन्हा धडधडली. मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्यावर त्यांनी टीकास्त्र सोडले.जरांगे पाटील हे लढाई कुणाची करतायेत. आरक्षणाची की महाविकास आघाडीची,असा सवाल त्यांनी विचारला आहे. माझ्याकडे देखील मराठे बांधव आहेत.ते राजकीय पोळी भाजून घेत आहेत तेव्हा दूध का दूध,पानी का पानी करून दाखवतो,असा इशाराही त्यांनी दिला.**



आ.राऊत यांनी सोमवारी पत्रकार परिषद घेवून पुन्हा एकदा आपली भूमिका व्यक्त केली. विशेष अधिवेशन बोलावण्यासाठी पत्र देवून जोपर्यंत सर्व पक्ष ओबीसीतून आरक्षण दयायचे का नाही याबाबत भूमिका स्पष्ट करत नाहीत, तोपर्यंत आपण मराठा चळवळीतील कार्यकर्ता या नात्याने बार्शीतील शिवसृष्टी येथे दि. २३ सप्टेंबरपासून दररोज सकाळी १० ते ५ असे ठिय्या आंदोलन करणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

बार्शीत शरद पवार यांची सभा झाली. त्यादिवशी माझ्यात व रोहित पवार यांच्यात आरोप-प्रत्यारोप झाले. त्यादिवसापासून मनोजदादा माझ्याबद्दल बोलू लागले. आम्ही याचा नेमका काय अर्थ समजायचा. तुम्ही मराठा आरक्षणाची लढाई लढता का महाविकास आघाडीची? आम्ही काय चूक केली? मी समाजाच्या बाबतीत योगदान दिले. केसेस मागे घेण्यासाठी सरकारवर दबाव आणला. तुमची (जरांगे) एसआयटी चौकशी सुध्दा मागे घ्या यासाठी सुध्दा भांडणारा मी एकमेव आमदार असेल. त्याचा खुलासा उपोषण सोडवायला आल्यानंतर मनोजदादा तुम्ही केला आहे. मग नेमके माझ्याकडून काय चुकले की तुम्ही मला बोलायले लागले,अशा शब्दात त्यांनी संताप व्यक्त केला.

आमच्या तालुक्यातील काहींना तुमचा संशय आला. तेवढेच उत्तर तुम्ही दयायच्या ऐवजी बघतो, दारातच येतो. ताईला सांगा, आईला सांगा असे म्हणालात. एवढा अहंकार असू नये. कोणी काही विचारायला गेले की, बघतो, करतो, दाखवतो, मुख्यमंत्र्यांसह सर्वांना शिव्या देता. तुम्हाला मराठा आरक्षणाची चळवळ अखंडपणाने कडेपर्यंत न्यायची की वेगळे काही साध्य करायचे आहे? हे मराठा समाजाला समजणे गरजेचे आहे. जरांगे यांच्या सोशल मिडीया पाठीमागे रोहित पवार यांचा हात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

फोन करून शिवीगाळ होत असल्याचे सांगून आमदार राऊत म्हणाले, दोन फोन उचलून मी माझ्या स्टाईलने उत्तर दिले. परंतु, हे बंद करा आमच्याजवळ पण मराठा बांधव आहेत. तुम्ही जर असे फोन करून शिवीगाळ करायला लागले तर जशास तसे उत्तर दिले जाईल. हलक्यात घेवू नका. मराठा चळवळीला गालबोट लागू देवू नका. समाजाच्या नावावर कोणीतरी राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करतंय. दूधाचे दूध व पाण्याचे पाणी करतो,असा इशाराही दिला. मी त्यांना प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी मला फडणवीस व राऊतचा माणूस असे म्हटले. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर आपण काँग्रेसच्या काळातही आंदोलन केले होते. समाजासाठी योगदान देणाऱ्या माणसाची किंमत केली पाहिजे. जरांगे यांच्या सांगण्यावरून आपण महायुतीच्या विरोधात मतदान केले. निवडून आलेल्या खासदारांनी आपल्या मागणीला पाठिंबा दिला का ? तर नाही.. मग का तुम्ही त्यांना विचारत नाही ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

### आरक्षणाला खरा खुट्टा; शरद पवारांनी मारलाय

आमच्या मराठा आरक्षणाला जो खुट्टा मारून ठेवलाय, तो उपटल्याशिवाय मी राहत नसतो असे जरांगे हे मंत्री छगन भुजबळ यांना उद्देशून कांही दिवसांपूर्वी म्हणाले होते. परंतु, ही समाजाची दिशाभूल असून मराठा आरक्षणाचा खरा खुट्टा सन १९९४ च्या शासन निर्णयाने शरद पवार यांनी मारलाय, असा आरोप करत तुमच्यात हिंमत असेल तर या प्रश्नाचे उत्तर द्या असे आव्हान मराठा आरक्षण चळवळीतील कार्यकर्ते आण्णासाहेब शिंदे यांनी सोमवारी जाहीर सभेतून दिले. जरांगे यांनी आपल्या प्रश्न व शंकांची उत्तरे न दिल्याने आण्णा शिंदे यांनी बार्शीत शिवसृष्टी येथे एक दिवसीय ठिय्या आंदोलन केले. त्यावेळी ते बोलत होते.

### हा आ.पवारांचा कट

जरांगे यांचे जिथे आंदोलन आहे, तिथे रोहित पवारांची टीम आधी जाते. सगळी व्यवस्था होते, मगच सगळे आंदोलन केले जाते माजी मंत्री दिलीप सोपल यांच्या घरी शरद पवार येऊन गेले तेव्हापासून हे सुरु आहे, मला वाटते हे सगळे कट कारस्थान रोहित पवार यांनी केले आहे, असा माझा संशय आहे, असेही राऊत यांनी म्हटले आहे.

## दारू पिऊन पडल्याने वृद्ध इसम बेशुद्ध

✔ **मोहोळ :** दारू पिऊन वाटेत पडल्याने विष्णू श्रीपती होनमाने (वय ६० रा.मोहोळ) हा डोकीस मार लागून बेशुध्द झाला. ही घटना रविवारी सायंकाळच्या सुमारास मोहोळ येथील लक्ष्मीपार्क येथे घडली. त्याला गणेश (पुतण्या) यांनी बेशुध्द अवस्थेत सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

## आ.राऊत यांच्या विरोधात सोलापुरात आंदोलन

✔ **सोलापूर :** बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांनी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्यावर टीका केल्याने मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी सोमवारी सोलापुरात आंदोलन केले.यावेळी आ. राऊत यांच्याविरोधात घोषणा करण्यात आल्या.उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी येथील मराठा समाजाने एकत्रित येत हे आंदोलन केले. आ. राऊत यांचे वक्तव्य असेच सुरू राहिल्यास गनिमी काव्याने त्यांना उत्तर देण्याचा इशारा देण्यात आला. जरांगे पाटलांची माफी मागा, अन्यथा बार्शीत येऊन धडा शिकवू,असा इशारा संभाजी ब्रिगेडने आ. राऊतांना दिला आहे.




सोलापूर : सोलापुरात मानाचा कसबा गणपतीच्यावतीने यंदा संत मीराबाई यांचे भजन हा देखावा सादर केला आहे.

## गुन्हा मागे घेण्यासाठी मारहाण; तिघांवर गुन्हा

✔ **पंढरपूर :** भावाने चिठ्ठी लिहून आत्महत्या केली होती.त्याप्रमाणे पोलिसांनी दाखल केलेला गुन्हा मागे घे, या कारणावरून तरुणास काठी आणि लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आली. ही घटना नारायण चिंचोली (ता.पंढरपूर) येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी तिघा विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात महावीर मसाजी बनसोडे (वय२७ रा .नारायण चिंचोली) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली.

त्याप्रमाणे पोलिसांनी सुखदेव हाडमोडे, उमेश हाडमोडे आणि सागर विठ्ठल हाडमोडे (सर्व रा.नारायण चिंचोली) या तियारविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. महावीर बनसोडे यांचा भाऊ नितीन बनसोडे याने प्रेम प्रकरणातून चिठ्ठी लिहून आत्महत्या केली होती. त्यानुसार महावीर बनसोडे यांनी हवेली पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली होती. त्याप्रमाणे पोलिसांनी वरील तिघा विरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. तो गुन्हा मागे घे असे म्हणत तिघांनी त्यांना मारहाण केली .अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार माळी पुढील तपास करीत आहेत.

## मुरारजीपेठ येथील लॉजमध्ये इसमाचा संशयास्पद मृत्यू

✔ **सोलापूर :** येथील मुरारजी पेठेतील भाग्यलक्ष्मी लॉज येथे एका ४१ वर्षीय इसमाचा मृतदेह संशयास्पद अवस्थेत आढळून आला. ही घटना सोमवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली.

महादेव भिमराव चलवादे (वय ४१, रा. निम्बर्गी ता.दक्षिण सोलापूर) असे मयताचे नाव आहे. तो भाग्यलक्ष्मी लॉज येथे राहण्यात आला होता. आज सोमवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास तो लॉजच्या खोलीत बेशुद्ध अवस्थेत आढळला होता.

त्याला पोलिसांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. त्याच्या मृत्यू नेमका कशामुळे झाला, यासाठी शवविच्छेदन करण्यात आले. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून हवालदार ढोबळे पुढील तपास करीत आहेत.

## बकरे विकण्याच्या भांडणातून मारहाण

✔ **सोलापूर :** बकरे विकण्याच्या भांडणातून चाकू, लोखंडी रॉड, दगड आणि काठीने झालेल्या मारहाणीत चौघेजण जखमी झाले. या दोन्ही घटना मंगळवार बाजार आणि बुधवार बाजार परिसरात रविवारी रात्रीच्या सुमारास घडल्या.सर्व जखमींना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. अजीम सादिक चौधरी (वय ३०) त्याचा भाऊ अमजद सादिक चौधरी (वय २४ दोघे रा.तेलंगी पाच्छापेठ) अशी पहिल्या भांडणात जखमी झालेल्या तरुणांची नावे आहेत. रविवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास मंगळवार बाजार येथील मटण मार्केट जवळ बकरे विकण्याच्या भांडणातून त्यांना अल्ताफ अलमेलकर, शफी अलमेलकर आणि ७ ते ८ जणांनी मिळून लोखंडी रॉड, चाकू आणि फायबरच्या पाईपने मारहाण केली,

## वीज कर्मचाऱ्यांच्या वेतनात घसघशीत वाढ

✔ **मुंबई :** राज्य सरकारने महाराष्ट्र महावितरण व महापारेषण या कंपन्यातील कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीची घोषणा केली. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात १९ टक्क्याने वाढ केली जाणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतला असून तीनही वीज कंपनीतील कंत्राटी कामगारांना १९% वेतन वाढ मिळाली आहे. आता महाराष्ट्रात इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक वेतनवाढ देण्यात आलेली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बाप्पा, या रिल्स मेकिंगने सर्वांना वेड लावलंय !!!

| कल्याण |
|---|
| 268-69-450 |

| मुंबई |
|---|
| 350-88-459 |

# फळवणीत पुन्हा बिबट्या दिसल्याने शेतकऱ्यांमध्ये घबराट

✔ वेळापूर/प्रतिनिधी

**माळशिरस तालुक्यातील फळवणी येथे ८ सप्टेंबर रोजी फळवणी गावापासून दीड किलोमीटर अंतरावर इंदलकर वस्तीवर रात्रीच्या सुमारास रमेश आवताडे यांच्या विहिरी जवळ रात्री नऊच्या सुमारास किशोर अवताडे व बिभीषण इंदलकर हे वाहनातून गेले असता त्यांना उसाच्या कडेला झाडाच्या आडोशाला बसलेला बिबट्या वाहनाच्या उजेडावरून बसला असल्याचे दिसून आले.**

त्यांना बिबट्या असल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी हा व्हिडिओ बनवून गावांमधील लोकांच्या मोबाईलवर टाकल्यानंतर फळवणी मधील ग्रामस्थांना आपल्या गावामध्ये परत एकदा बिबट्या आल्याचे कळले. बिबट्याच्या दहशतीने फळणी परिसरामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर घटना वन विभाग माळशिरस यांना कळल्यानंतर वनविभागाचे कर्मचारी यांनी सोमवारी सकाळी फळवणी इंदलकर वस्तीवर रात्रीच्या सुमारास ज्या ठिकाणी बिबट्या लोकांना दिसून आला होता त्या ठिकाणची कसून पाहणी केली असता वन विभागाला त्या ठिकाणी ठसे आढळून आले हे ठसे बिबट्याचे असल्याचे वनपाल अशोक लोखंडे यांनी सांगितले .



**फळवणी तालुका माळशिरस येथील इंदलकर वस्ती परिसरामध्ये बिबट्याचे दर्शन झाल्याने या परिसरात पिंजरा लावल्याचे दिसत आहे त्याचबरोबर दुसऱ्या छायाचित्रांमध्ये माढा खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी फळवणी गावात भेट देऊन ग्रामस्थांना बिबट्या बाबत मार्गदर्शन केले तिसऱ्या छायाचित्रांमध्ये बिबट्याच्या पायाचे ठसे दिसत आहेत.**



वन विभागाच्या वतीने बिबट्याला जायबंद करण्यासाठी दोन ठिकाणी इंदलकर वस्तीवर पिंजरे लावण्यात आले आहेत . त्याचबरोबर वन विभागाच्या वतीने नाईट पेट्रोलिंग सुरू करण्यात आले आहे व वन्य प्राण्यांबाबत जनजागृती करण्यास सुरुवात केली आहे . तसेच बिबट्या बाबतची माहिती कळताच फळवणी गावाला माढा खासदार धैर्यशील मोहिते पाटील आणि सहाय्यक वनरक्षक विशाल चव्हाण यांनी भेट देऊन बिबट्या विषयी मार्गदर्शन केले. तसेच वन्य प्राण्याबाबत लोकांमध्ये असणारा गैरसमज व बिबट्याचे वर्तणूक याबाबत जनजागृती केली. फळवणी ग्रामपंचायत येथे फळवणी येथील ग्रामस्थांनी खासदार धैर्यशील मोहिते पाटील व सहाय्यक वनरक्षक चव्हाण यांचा सत्कार केला. यावेळी वनपाल लोखंडे ,वनपाल लडकत, वनपाल सावंत ,वनरक्षक जगदाळे, सरपंच उपसरपंच पोलीस पाटील व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

### ३/११/२०२२ रोजी बिबट्या फळवणीत दिसला होता

३/११/२०२२ रोजी बिबट्या हा सांगोला अकलूज रोड वरून एक वाहन जात असताना त्या वाहनातील लोकांना रोडच्या आतल्या बाजूला बिबट्या उभा असल्याचे दिसून आले असता यावेळी त्यांनी वाहनाच्या लाईटच्या प्रकाशातून मोबाईल वरून बिबट्याचा फोटो काढून फळवणी गावातील नातेवाईकांना पाठवून माहिती दिली होती तर त्याच दिवशी पहाटेच्या सुमारास नारायण अवताडे यांच्या शेतात बांधलेल्या बारा महिन्याच्या कालवडावर हल्ला करून फाडून खाल्ले होते तर पाळीव कुत्र्याचा ही जीव घेतला होता. त्यावेळी फळवणी परिसरात बिबट्याची मोठी दहशत पसरली होती.